॥ सा विद्या या विमुक्तये ॥

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड - ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत

# SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA

Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade

## NATIONAL SERVICE SCHEME DEPARTMENT

ax : (02462) 215572

ıone: (02462) 215246

website: srtmun.ac.in

E-mail: nss@srtmun.ac.in

जा.क्र.: रासेयो/२०२६–२७/५६ दिनांक : ०२/०७/२०२६

**परिपत्रक**

प्रति,

**मा.प्राचार्य/रा.से.यो.कार्यक्रम अधिकारी,**

**रा.से.यो.राबविणारी सर्व संलग्नीत महाविद्यालये, व रा.से.यो. पथक विद्यापीठ परिसर, प्रस्तुत विद्यापीठ.**

**विषयः— एचआयव्ही प्रतिबंध आणि नियंत्रण उपक्रमांना पुढे नेण्यासाठी सहकार्य बळकट करणे बाबत.**

**संदर्भः—** डॉ. एन.एच.सिदालिंगा स्वामी, सल्लागार धोरण आणि शैक्षणिक नियोजन विभाग, अखिल भारतीय तंत्र परिषद, नवी दिल्ली यांचा ०६/०१/२०२६ रोजी चा ई–मेल.

**महोदय,**

उपरोक्त विषयी संदर्भिय ई–मेल अन्वये डॉ. एन.एच.सिदालिंगा स्वामी, सल्लागार धोरण आणि शैक्षणिक नियोजन विभाग, अखिल भारतीय तंत्र परिषद, नवी दिल्ली यांनी शिक्षण मंत्रालयाच्या उच्च शिक्षण विभाग आणि आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाची राष्ट्रीय एड्स नियंत्रण संस्था (NACO) यांच्यात रेड रिबन क्लब (RRCs) च्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये HIV/AIDS बाबत जागरूकता आणि प्रतिबंधाला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने सुरू असलेल्या सहकार्याकडे लक्ष वेधले जात आहे. त्यानुषंगाने युवकांमध्ये जागरूकता वाढवण्यासाठी आणि २०३० पर्यंत एड्सला सार्वजनिक आरोग्यासाठी असलेला धोका म्हणून संपुष्टात आणण्याच्या राष्ट्रीय उद्दिष्टात योगदान देण्यासाठी खालील हे उपाय करणे आवश्यक आहे.

- खाजगी संस्थासह सर्व संस्थामध्ये रेड रिबन क्लब (आरआरसी) सक्रियपणे कार्यरत असल्याची/स्थापित झाल्याची खात्री करणे.
- विद्यार्थ्यांमध्ये एच.आयव्ही/एड्स जागरूकता आणि संबधित उपक्रमांना प्रोत्साहन देणे.
- संबधित राज्य एड्स नियंत्रण संस्थेशी (SACS) समन्वय साधण्यासाठी नोडल अधिका–याची नियुक्ती करणे.
- आस्थपनांसाठी एच.आयव्ही आणि एड्स धोरण, २०२२ नुसार तक्रार अधिका–याचे नियुक्ती सुनिश्चित करणे.

तरी त्याअनुषगाने रा.से.यो. संलग्नित सर्व महाविद्यालयांना सुचित करण्यात येते की, उपरोक्त बाबी लक्षात घेता हे प्रकरण महत्वाचे मानून आपल्या महाविद्यालयात उपरोक्त पणे निर्देशित केलेल्या सुचनांनुसार कार्यवाही करण्यात यावी त्याबाबतचा अहवाल प्रस्तुत विद्यापीठातील रा.से.यो. विभागाच्या **nss@srtmun.ac.in** या ई–मेल वर सादर करण्यात यावा. ही विनंती.

**सोबत:** https://drive.google.com/file/d/1bnyBATD-OHZc2PLXSf0kOcu1DYUgl8Y-/view?usp=sharing

**डॉ. मारोती गायकवाड**

**संचालक**

राष्ट्रीय सेवा योजना विभाग

**प्रत माहितीस्तव:**

१) मा. कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.

२) मा. प्र. कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.

३) मा. कुलसचिव कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.

४) मा.जनसंपर्क अधिकारी, जनसंपर्क कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.

**प्रत माहिती तथा कार्यवाहिस्तव:**

१) सिस्टीम एक्सपर्ट, संगणक कक्ष, प्रस्तुत विद्यापीठ, यांना प्रत देवून कळविण्यात येते की, सदरील परिपत्रक विद्यापीठाच्या व रा.से.यो विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे, ही विनंती.